# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 08 October 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०८ ऑक्टोबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राष्ट्रविकासाला गती देण्यात महाराष्ट्र सर्वात पुढे-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटन प्रसंगी पंतप्रधानांचं प्रतिपादन
- इज ऑफ डूइंग बिसनेसमधून गुंतवणूकदारांच्या समस्या सोडवण्याला शासनाचं प्राधान्य-ब्रिटिश शिष्टमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांची माहिती
- पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याचा राज्यशासनाचा निर्णय
- शेतकरी कुटुंबांसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाचा 'हात मदतीचा' उपक्रम

आणि

- पूरग्रस्तांना अधिक मदत देण्याच्या मागणीसाठी विरोधकांचं आंदोलन

****

देशाच्या विकासाला गती देण्यात महाराष्ट्र सर्वात पुढे असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद मोदी यांनी केलं आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याचं तसंच मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व सार्वजनिक वाहतुक सेवेचं तिकीट देणाऱ्या 'मुंबई वन', या देशातल्या पहिल्या मोबिलिटी ॲपचं, लोकार्पणही पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नवयुगीन आणि पारंपारिक अल्पकालीन अभ्यासक्रमांच्या पहिल्या तुकडीला पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ झाला. यावेळी केलेल्या भाषणांत पंतप्रधानांनी,

गेल्या अकरा वर्षात विकसित भारताचा संकल्प तडीस नेण्यासाठी विकास कामांचा वेग वाढल्याचं नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद मोदी**

केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री के राममोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. नवी मुंबईच्या या विमानतळावर दोन टर्मिनल असून ते भुयारी बोगद्यांनी जोडलेले आहेत. विमानतळावर दोन स्वतंत्र धावपट्ट्या असून प्रत्येक धावपट्टीसाठी स्वतंत्र टॅक्सीवे देण्यात आले आहेत.

या विमानतळामुळे शेतकरी, मत्स्योत्पादक तसंच लघु उद्योगांना जागतिक बाजारपेठेत आपली उत्पादनं पाठवणं सुलभ होणार असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद मोदी**

वस्तू आणि सेवा कर रचनेतल्या सुधारणेमुळे यंदा नवरात्रात विक्रमी उलाढाल झाली, आपलं सरकार असेच निर्णय यापुढेही घेत राहील, असं सांगतानाच, नागरिकांना स्वदेशी धोरणाचा अवलंब करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

****

इज ऑफ डूइंग बिसनेस धोरणाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांच्या समस्या लवकर सोडवण्याचं शासनाचं धोरण आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत ते आज ब्रिटिश शिष्टमंडळासोबत बैठकीत बोलत होते. राज्यातील गुंतवणूक वातावरण, पायाभूत सुविधा आणि भावी विकास आराखड्याबाबत मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला सविस्तर माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर हे इलेक्ट्रिक वाहन उद्योग केंद्र होत असून, नागपूर सोलर मॉड्युल उत्पादन केंद्र, तर पुणे हे उद्योगांचं प्रमुख केंद्र असल्याचं सांगत, गुंतवणूकदारांनी महाराष्ट्रात पुढाकार घेण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. ब्रिटिश शिष्टमंडळातील सदस्यांनीही महाराष्ट्रातील वेगाने वाढणाऱ्या उद्योगक्षेत्राबद्दल समाधान व्यक्त करत एआय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात गुंतवणुकीचा मानस व्यक्त केल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्यशासनानं घेतला आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज यासंदर्भात झालेल्या बैठकीत ही माहिती दिली. पुरामुळे कागदपत्रं, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचं शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जात असून शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन पाटील यांनी केलं

****

शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाला अधिकृत नाव आणि धनुष्यबाण चिन्ह देण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात येत्या १२ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. आज झालेल्या सुनावणीत ठाकरे यांच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ कपिल सिब्बल यांनी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी २०२६ मध्ये अपेक्षित असल्यामुळे ही सुनावणी लवकरात लवकर घेण्याची विनंती केली.

****

लातूर जिल्ह्यातल्या औसा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासना इतकीच मदत देण्याची घोषणा आमदार अभिमन्यू पवार यांनी केली आहे. पवार यांच्या क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि पुणे इथल्या अभय भुतडा फाउंडेशनच्या माध्यमातून ही मदत दिली जाणार आहे. उद्योजक बी.बी. ठोंबरे यांच्या हस्ते लवकरच दिवाळी फूड पॅकेट, आनंदी धनादेशाचे वाटप करणार असल्याचंही पवार यांनी सांगितलं

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने आत्महत्याग्रस्त तसंच अतिवृष्टीबाधीत शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी 'हात मदतीचा' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ११ ते १५ ऑक्टोबरदरम्यान हा उपक्रम राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. या उपक्रमाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून –

**या उपक्रमांतर्गत ११ तारखेला पात्र कुटुंबाकडून अर्ज भरुन घेतले जाणार असून, प्रशासकीय यंत्रणेच्या सहाय्याने सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात येईल. १३ ऑक्टोबरला कामकाजाचा आढावा घेऊन, अपूर्ण कामं पूर्ण केली जातील. तर १४ तसंच १५ ऑक्टोबरला प्रत्येक तहसील कार्यालयात एका साध्या कार्यक्रमात पात्र**

**कुटुंबांना मदतीचे धनादेश दिले जातील. निकषांत न बसणाऱ्या गरजू कुटुंबांना स्वयंसेवी संस्था, संघटना यांच्या माध्यमातून मदत केली जाणार असल्याचं, याबाबतच्या आदेशात म्हटलं आहे.**

****

अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची आर्थिक भरपाई पुरेशा प्रमाणात मिळावी, या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करण्यात आली. हेक्टरी सरसकट ५० हजार रुपये नुकसान भरपाई, संपूर्ण कर्जमाफी, पिक विम्याचे निकष शिथील करणं, आदी मागण्यांचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलं.

****

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तहसील कार्यालयासमोरही पक्षाच्या वतीनं आज धरणे आंदोलन करण्यात आलं. तहसीलदार जीवनकुमार कांबळे यांना मागण्यांचं निवेदन देण्यात आलं.

****

राज्यातील सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित जाळे, संचलन आणि देखरेख करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. रुग्णांच्या सेवेत रुजू केल्या जाणाऱ्या अत्याधुनिक १०८ रुग्णवाहिका निर्धारित वेळेत सेवेत रुजू करून आवश्यकतेनुसार ठिकाणे निश्चित करण्याचे निर्देशही आबिटकर यांनी दिले.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं उपजिल्हा रुग्णलय उभाण्यासाठी आबिटकर यांनी सकारात्मकता दर्शवल्याचं आमदार विलास भुमरे यांनी सांगितलं आहे. पैठण तालुक्याची वाढती लोकसंख्या आणि आरोग्याच्या समस्या लक्षात घेता या रुग्णालयाची आवश्यकता भुमरे यांनी वर्तवली आहे

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ' युवक महोत्सव येत्या १२ ते १५ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. विष्णुपुरी इथल्या ग्रामीण तंत्र आणि व्यवस्थापन परिसरात होणाऱ्या या महोत्सवात चार जिल्ह्यातल्या ८५ महाविद्यालयांचे जवळपास दीड हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं गोरक्षकाला प्राणघातक मारहाणीच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने आज क्रांती चौकात तीव्र निदर्शनं करण्यात आली. हल्लेखोरांवर मकोका लावून कठोर कारवाई करण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

****

एकदिवसीय क्रिकेट महिला विश्वचषक स्पर्धेत उद्या भारताचा सामना दक्षिण आफ्रिका संघासोबत सामना होणार आहे. विशाखापट्टणम इथं हा सामना होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघ चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर तर दक्षिण आफ्रिका दोन गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.

****

आंतरराष्ट्रीय शूटिंग स्पोर्ट फेडरेशन–ISSF जागतिक नेमबाजी अजिंक्यपद – स्पर्धा आजपासून ग्रीसमध्ये अथेन्स इथं सुरू होत आहे. या स्पर्धेत भारताचे १२ नेमबाज सहभागी होणार आहेत.

****

हिंगोली जिल्ह्यात सध्या पाऊस थांबला असल्यामुळे येलदरी, सिद्धेश्वर आणि पैनगंगा प्रकल्पातून होणारा पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्पातून पूर्णा नदीपात्रात होणारा विसर्ग थांबला आहे तर पैठणच्या जायकवाडी धरणातून सध्या साडे १४ हजार घनफूट प्रतिसेकंद वेगानं विसर्ग सुरू आहे.

****

हवामान

मराठवाड्यात लातूर आणि धाराशिव जिल्ह्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणाच्या काही भागात हवामान विभागाने आज यलो अलर्ट दिला आहे. तर उद्या सोलापूर, सांगली, कोल्हापूर तसंच सिंधुदुर्ग जिल्ह्याला यलो अलर्ट देण्यात आला आहे.

****